# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष १ ले. अंक ९ वा. नवी मुंबई दिनांक १ ते ३१ मार्च २०१२ पाने १६ किंमत २० रूपये

## ग्रामसभेत सहभाग हा सर्वांचा जन्मसिद्ध अधिकार !

## आमचा गाव





## आमचे राज्य

### माहितीचा अधिकार वापरा

### गावाचा हिशोब सर्वासमारे ठेवा

## नगरराज बील अंमलबजावणी झालीच पाहिजे !

## रेडिमेड प्रश्नावली



सरकारी विभागांना काय व कोणती माहिती मागावी ?

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी
किरण मांजरेकर (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई)
राजेश बने (रायगड)
भगवान वाहूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
प्रीतम यादव (सातारा)
अजित कोठारी (जालना)
देविदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com

नागरिक अधिकार या मासिकासाठी स्वराज बहुउद्देशीय संस्था,खारघर नवी मुंबई यांच्याकडून छपाई व वितरणासाठी अर्थसाहय उपलब्ध झाले आहे.

## संपादकीय...........

## "असेल हिंम्मत लढणाऱ्यांची त्यांनी यावे"

माहितीचा अधिकार कायद्याचा आधार घेऊन प्रशासन स्वच्छ तसेच जनतेप्रती जबाबदार व पारदर्शक व्हावे म्हणून महाराष्ट्रात आज सुमारे दहा हजार आरटीआय ॲक्टिव्हिस्ट कार्यरत आहेत. आरटीआय कार्यकर्ता म्हणून कार्य करताना या कार्यकर्त्यासमोर समस्या आहेत, अडचणी आहेत तसेच काही आव्हाने देखील आहेत. बहूसंख्य कार्यकर्ते खिशाला कात्री लावून प्रशासनातील कच्चे दूवे शोधण्याचा प्रयत्न करीत असतात. आमच्या रोजचे जगणे सोपे करणारे अनेक प्रश्न आज जटील बनेल आहेत.अगदी हवा,पाणी,अन्न,वाहतूक,वीज ,आरोग्याच्या सेवा हे ही वेळेवर व पुरेसे मिळणे दुरापास्त झाले आहे प्रशासनातील साधारण ९० टक्के लोक भ्रष्ट साखळीत गुंतलेले आहेत.१०टक्के बऱ्यापैकी प्रमाणिक व जबाबदारीने काम करीत आहेत. हे वास्तव नाकारता येणार नाही.या चांगल्या लोकांना सोबत घेवून एक चांगले काम करून जनतेपर्यंत चांगला संदेश पोहचविणे ही माहिती अधिकार कार्यकर्त्यांकडून होणारी चांगली कृती असेन.अशी कृती करणे ही काळाची गरज आहे.

आज प्रशासनाच्या पातळीवर अनेक चांगल्या योजना राबविल्या जात आहेत.योजना चांगल्या आहेत परंतु या योजना चालविणाऱ्या प्रशासनात काही अडथळे आहेत.झारी छान आहे.झारीत पाणीही आहे.परंतु ते पाणी सुकलेल्या फुल झाडापर्यंत धडपणे पोहचत नाही.कारण या झारीच्या नळीत काही शुक्राचार्य रूपी किडे बसलेले आहेत.ते भ्रष्ट किडे शोधण्याचे काम माहिती अधिकार कार्यकर्त्यांना करायचे आहे. हे भ्रष्ट किडे घातक व विखारी आहेत. या घातक मंडळीच्या विरोधात समाज हिताचा एल्गार उभा करण्यासाठीच माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ निर्माण झाला असून माहिती अधिकार, ग्रामसभा अधिकार, नगरस्वराज अधिकार,तसेच शेवटच्या माणसाला हक्क देणाऱ्या अनेक लोकशाही सुधारणा अशा माध्यमातून कार्यकर्त्यांनी व्यापक कार्य करावे अशी अपेक्षा आहे.अनेक ठिकाणी असे कार्यकर्ते काम करीत आहेत.त्यांना पाठबळ व संघटना बळ उपलब्ध करून देण्याची गरज आहे.आपण जर व्यापक समाज हिताचा अजेंडा घेवून चालत असू तर कसोटीचे क्षण पार पडे पर्यंत आव्हान असेत ते एकदा पेलेले की मग समाज आपलया पाठीशी उभ राहतो.

जिथं उमटलेला ठसा जतन केला जाईल तिथंच शिक्का उमटवावा.नाहीतर ते निवडणूकीचे शिक्के होतात.

# आमचे गांव आमचे राज्य



## ग्रामसभेत सहभाग हा सर्वांचा जन्मसिद्ध अधिकार !

१) गावातील ग्रामसभा / शहरातील वार्ड सभा ही सर्वोच्च निर्णय सभा आहे.ग्रामसभेत सर्व स्त्री-पुरूष नागरिकांना सहभागी होण्याचा व मते मांडण्याचा हक्क आहे.प्रत्येक गावात उघडपणे वर्षातून किमान सहा व जास्तीत जास्त ग्रामसभा / वार्ड सभा झाल्याच पाहिजेत या साठी प्रयत्न करणे.

२) गावाच्या विकासाचे ,उन्नतीचे, शेती विकासाचे शिक्षणाचे, आरोग्याचे ग्राम प्रशासनाचे, गावाला पुरविण्यात येणाऱ्या रस्ता,वीज,पाणी, वन उपजावरील अधिकार, भूसंपादन, तसेच गावाच्या सामुहिक कल्याणाच्या उपक्रमाचे, मनरेगा योजनेचे सर्व अधिकार गावाच्या ग्रामसभेत / वार्डसभेत चर्चेतून व सर्व ग्रामस्थांच्या मताचा विचार करून सहमतीने घेतले गेले पाहिजेत.

३) गावाला मिळणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना उदा.शेती अवजारे वाटप,बि-बियाणे, कृषी सबसीडी, घरकूल वाटप,किसान निवृत्तीवेतन निराधार योजना आदी सर्व व्यक्तीगत लाभांच्या योजना गावात प्राधान्याने कोणाला मिळाव्यात याची ग्रामसभेत चर्चा होऊन निर्णय झाला पाहिजे. त्यामुळे गरजूनांच या योजना प्राधान्याने मिळतील .

४)गावाला राज्य व केंद्र शासनाकडून आलेले योजनारूपी व थेट बजेट ग्रामपंचायतीचे उत्पन्न व वार्षीक खर्च याचा हिशोब सर्वांसाठी पारदर्शक पणे ग्रामसभेत मांडला गेला पाहिजे.चावडीवर ही हिशोबपत्रके चिकटवली गेली पाहिजेत.

५)गावातील लोकसेवक उदा. ग्रामसेवक, तलाठी, सरकारी व शासनमान्य अनुदान प्राप्त शाळेतील शिक्षक,प्राथमिक आरोग्य केंद्रातील नर्स व डॉक्टर वनाधिकारी,अंगणवाडी संचालिका अशी सर्व तत्सम लोकसेवक नियमीत ग्रामसभेला उपस्थित राहिलीच पाहिजेत व ते प्रमाणिकपणे सेवा देतात की नाही याची चर्चा ग्रामसभेत झाली पाहीजे.योग्य सेवा न देणाऱ्या व कामचूकारपणा करणाऱ्या लोकसेवकांस समज देणे व आर्थिक दंड देण्याचा ग्रामसभेस अधिकार असायलाच हवा.

६) ग्रामसभेने घेतलेले निर्णय अंमलात आणाणारे कार्यकारी मंडळ म्हणून ग्रामपंचायतीचे सरंपच व सदस्य यांनी जबाबदारीने काम केले पाहिजे.

७)जर ग्रामपंचायत ग्रामसभा घेत नसेल तर संपूर्ण गावातील एकूण २५ टक्के मतदारांच्या सहया घेवून अधिकारी सरपंच व पंचमंडळीना पदावरून हटविण्याचा ग्रामस्थाना अधिकार आहे.यासंबधी गटविकास अधिकाऱ्याकडे लेखी निवेदन द्यावे.मात्र अशी तक्रार करणारे मतदार हे ग्रामपंचयतीच्या कराचे थकबाकी दार नसावेत तसेच त्यांच्याकडे शौचालयाची सोय असणे बंधनकारक आहे.

गैरसमज हा कॅन्सर सारखा असतो,तिसऱ्या अवस्थेला पोहचल्यावर तो आपलं स्वरुप प्रकट करतो

# माहितीचा अधिकार वापरा गावाचा हिशोब सर्वांसमारे ठेवा

१) ग्रामसेवकांने दरवर्षी हा १५ ऑगष्ट,२६ जानेवारी, २ ऑक्टोबर व १ मे या राष्ट्रीय सणाच्या दिवशी तसेच अन्य महत्वाच्या निर्णय प्रसंगी ग्रामसभा बोलवावी असा लेखी पत्राद्वारे आग्रह धरणे.जर ग्रामविकास अधिकारी व सरंपच ग्रामसभा भरवित नसतील किंवा गुपचून कागदावर ग्रामसभा घेतल्याचे दाखवित असतील तर.गावात ग्रामसभा घेणे हे कायद्याने बंधनकारक आहे.आणि ग्रामसभेत प्रत्येक स्त्री -पुरषांना हजर राहण्याचा आपली मते व सूचना मांडण्याचा अधिकार आहे.तसेच ग्रामसभेत बहुमताने घेतलेले निर्णय ग्रामपंचायतीने अंमलात आणणे बंधनकारक आहे.याबाबत कार्यकर्त्यांनी गावातील नागरिकांशी माहिती देवून जनजागरण करून गावात ग्रामसभा भरविण्यासाठी वातावरण निर्माण केले पाहिजे.

२) गावाच्या विकासाचे,उन्नतीचे,शेतीविकासाचे शिक्षणाचे, आरोग्याचे ग्रामप्रशासनाचे,गावाला पुरविण्यात येणाऱ्या रस्ता,वीज,पाणी, वनउपजावरील अधिकार,भूसंपादन,तसेच गावाच्या सामुहिक कल्याणाच्या उपक्रमाचे माहिती तसेच महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या अंमलबाजवणी व हिशोब विषयीची कागदपत्रे ग्रामपंचायत,गटविकास अधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदे मधील संबंधीत विभागात माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करून मागवून घेवून गामस्थाना सदर माहिती मिटींग घेवून उघड सांगितली पाहिजे.

३) गावाला मिळणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजना उदा.शेती अवजारे वाटप,बि-बियाणे, कृषी सबसीडी, घरकूल वाटप,किसान निवृत्तीवेतन निराधार योजना आदी सर्व योजना गावात प्राधान्याने कोणाला मिळाल्या आहेत.याची माहिती अधिकार कायद्याने माहिती घेवून गावासमोर मिटींग घेवून उघड करावी.कोणी नियमबाहय पणे योजनेचा गैर फायदा घेतला असेल तर त्यामुळे गावातील एक गरजु नागरिकांचा हक्क डावलला गेला.हे सर्व ग्रामस्थाना समजावून सांगावे.

४).गावाला राज्य व केंद्र शासनाकडून आलेले योजनारूपी व थेट बजेट ग्रामपंचायतीचे उत्पन्न व वार्षीक खर्च याचा हिशोब सर्वांसाठी पारदर्शक पणे ग्रामसभेत मांडला जात नसेल तर ग्रामपंचायत व बीडीओ कडून असा हिशोब माहिती अधिकारात मागवून गावासमोर मिटिंग घेवून जाहिर करावा.

५)गावातील लोकसेवक उदा.ग्रामसेवक,तलाठी,सरकारी व शासनमान्य अनुदान प्राप्त शाळेतील शिक्षक,प्राथमिक आरोग्य केंद्रातील नर्स व डॉक्टर वनाधिकारी,अंगणवाडी संचालिका हे सर्व ग्राम पातळीवरील लोकसेवक नियमीत हजर राहतात काय ?त्यांची कामाची जबाबदारी, कामाचे स्वरूप गावात काम करण्याची व हजर राहण्याची वेळ,त्याच्याकडे गावासाठी आलेली सरकारी मदत,त्यांच्या ताब्यात असणारी शासकीय साधनसामुग्री याची माहिती अधिकाराच्या माध्यमातून माहिती मागवून सदर माहिती सर्व ग्रामस्थासमोर उघड करावी.

ग्रामपंचायतीकडे वर्षभरात कोठून किती व केव्हा निधी आला.आलेला पैसा कसा कोठे व केव्हा खर्च झाला.हे ग्रामसभेत सर्वासमोर हिशोब सादर करणे आवश्यक आहे.अर्थिक वर्षे संपताच अशी ग्रामसभा घेवून हिशोब सादर करण्यास ग्रामसेवक व सरपंचास गावकऱ्यांनी भाग पाडले पाहिजे.गावात कोणाला किती सरकारी मदत किंवा अनुदान भेटले.याचा सगळा लेखाजोगा ग्रामसभेत मांडला गेला पाहिजे असे होत नसल्यास माहितीच्या अधिकारात सर्व माहिती मागवून
ती गावकऱ्यासमोर ठेवली पाहिजे.हे काम सर्व गावकऱ्यांना विस्वासात घेवून गावातील तरूण व धडपडया युवकांनी जरूर केलेच पाहिजे

आपलं कोणी अनुकरण किंवा द्वेष करायला लागलं की समजावं आपला उत्कर्ष होतोय.

## आपल्या परिसरातील ग्रामपंचायती मार्फत राबविण्यात आलेल्या विकासांच्या योजनांची माहिती अधिकारात माहिती मागविण्यासाठी नमूना

### माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

### (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती अधिकारी किंवा जनमाहिती अधिकारी

ग्रामपंचायत कार्यालय, गटविकास अधिकारी कार्यालय

--------------- पंचायतसमिती ------------

१) अर्जदारांचे नाव ---------------------------------------------

२) पत्ता : ---------------------------------------------------

३) माहितीचा विषय :-ग्रामपंचायतीच्या मार्फत राबविण्यात आलेल्या राज्य व केंद्र शासनांच्या विविध योजनांचा लेखाजोगा मिळणेबाबत.लाभार्थींची माहिती मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी( सन २०१० व सन २०११)

अ) वरील काळात आपल्या ग्रामपंचायतीस कोणकोणत्या योजना मंजूर झाल्या.त्या योजनांची यादी द्यावी.

ब) सदर योजना कधी,केव्हा मंजूर झाल्या याचा तपशील द्यावा

क) वैयक्तीक लाभांच्या योजनासाठी गावातून किती अर्ज आले.किती मंजूर झाले किती नामंजूर झाले सर्व अर्जदारांची नावे द्यावीत.

ड ) वैयक्तीक लाभांच्या योजनेतील नावाची मंजूरी ग्रामसभेत घेतली होती काय ? असल्यास ग्रामसभेचा तसा ठराव घेतल्याची प्रत मिळावी.

फ) वैयक्तीक लाभासाठी आलेल्या योजना ज्यां लाभार्थींना दिल्या त्यांच्या योजनेचे नाव,लाभाचे स्वरूप, पात्रतेचे निकष ,मंजूर झालेला निधी / किंवा वस्तू या संबधीचे कागदपत्रांच्या छायांकित प्रती द्याव्यातृ

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव -----------------)

मो.:

बेदय पैसा मिळवंण याच्याइतके खुज ध्येय दुसरं असूच शकत नाही. माणस जोडायला त्या पैक्षा बळ लागतं

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विश्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

स्पर्श न करताही आधार देता येतो हे ज्याला कळतं त्यालाच पालक शब्द समजला.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------

---------------------------------- पीनकोड

मोबाईल : | | | | | | | | | | |    | | | | | | | | | | |

शिक्षण : ---------------------- जन्मदिनांक | | | | | | | | |

व्यवसाय :-------------------- येणाऱ्या भाषा : ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे : ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /-----------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन.

आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : -------------

सही

सभासद कोड नंबर [ ] **कार्यालयीन उपयोगासाठी** मासिक वर्गणी नंबर [ ]

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१२ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१३
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये [ ] मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- शेरा ------------------------------------------------------------------------------

व्यायमाची शरिराला तशी वाचनाची मनाला गरज असते.

व्यासपीठ

# नगरराज बील कायदा अंमलांत आणा.

स्थानिक स्वराज संस्था आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हाव्यात म्हणून ग्रामीण भागासाठी ७३ वी घटना दुरूस्ती ग्रामसभेला आणि शहरी भागासाठी ७४ घटनादुरूस्ती झाल्यामुळे वार्डसभेला घटनात्मक दर्जा मिळालेला आहे.महाराष्ट्र शासनाने २००८ साली केंद्र सरकारकडून शहरी विकासासाठी मदत मिळावी म्हणून नगरराज बीलाचा कायदा विधीमंडळ मंजूर करून घेतला आहे.या कायद्यात अनेक त्रूटी आहेत.परंतु हा कायदा अंमलात आणण्याचा निर्णय घेण्यास मात्र महाराष्ट्र शासनाने अक्षम्य उदासिनता दाखविलेली आहे.हा कायदा अंमलात आणावा यासाठी राज्य शासनावर लोक दबाव आणण्याची गरज आहे.शहरी भागातील जाणाकर नागरिकांनी सदर मागणी लावून धरणे ही आता काळाची गरज बनली आहे.वार्ड कमिटीमुळे शहरी भागातील वार्डातील विकास कामात पारदर्शकता येईल कारण कायद्यातील तरतूदी नुसारविकास कामाचे अर्थिक बजेट मंजूर करणे,पावती तपासणे,वैकल्पीक उपाय सूचविणे असे अधिकार वार्ड किंवा क्षेत्रसभेकडे देण्यात आले आहेतपरंतु या विधेयकात अनेक त्रूटी या त्रूटी दूर करयासठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

### महाराष्ट्र शासनाने संमत केलेल्या नगरराज विधेयकातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे

१) सहा महिन्यातून एक क्षेत्रसभा बैठक नगरसेवकाच्या अध्यक्षतेखाली होईल.

२) ही क्षेत्रसभा दोन ते पाच मतदान केंद्राची असेल.एकूण मतदार २५०० ते७५०० च्या दरम्यान असतील.

३)क्षेत्रसभेचा सचिव महापालिका कर्मचाऱ्यामधून नियुक्त केला जाईल.

४)क्षेत्र सभा बोलविण्याची जबाबदारी नगरसेवकावर असेल. दोन वर्षात चार सभा भरविण्यात कसूर केल्यास आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार अशा नगरसेवकांस पालिका सदस्यत्वापासून अनर्ह ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे.

५)क्षेत्रसभेचे कार्य व कर्तव्यामध्ये क्षेत्रसभेला प्राधान्य क्रम सूचविणे जागा सूचविणे,उपाययोजना सूचविणे अशा तरतूदी आहेत.

६) क्षेत्रसभेस केवळ हक्क व अधिकारामध्ये माहिती मिळविण्याचा अधिकार दिलेला आहे.नगरसेवकांच्यास्तरावर कोणतीही वार्ड समिती नसेल.क्षेत्रसभा प्रतिनिधीची नियुक्त नगरसेवक करेल

७)नगर सेवकांनी सलग चार सभा न घेतल्यास त्याचे नगरसेवक पद रद्द होवू शकते.

८)

### नागरी संघटना व संस्थांनी नगरराज बीलात सूचविलेल्या सुधारणा व त्रूटी दूर करण्याची केलेली मागणी पुढीलप्रमाणे

१)क्षेत्रसभा प्रतिनिधीची निवड खूल्या निवडणूक पद्धतीने व्हावी.अन्यथ नगरसेवक आपल्या मर्जीतील लोकांची निवड करेल व त्यातून भ्रष्टाचार वाढेल.

२)वार्डसमिती असावी तसेच ही समिती प्रशासकीय समितीसारखी असावी वार्ड समितीला कमाल अधिकार असावेत.

३)नगरसेवकांचे पद रद्द करण्याचा अधिकार हा वार्डसभेत घेतला जावा व नगरसेवक पद रद्द करण्याचे आदेश महापौर यांना असावेत.

४)वार्ड समितीचा निधी वापरण्याचा निर्णय घेण्याचा अधिकार हा वार्डसभेस मिळाला पाहिजे.तसेच निधी वापराचे अधिकार कर्मचाऱ्या मिळावेत.वार्डसभेस केवळ माहिती घेणे व सूचना देण्याचा अधिकार असल्यास लोकसहभाग मिळविणे शक्य होणार नाही.तसेच अशा पोकळ तरतूदीमुळे ७४ घटना दुरूस्तीला कसलाच अर्थ राहत नाही.

५)वार्डसभेचा नगरसेवक अध्यक्ष राहिल्याने त्याच्या विरोधात तक्रारी किंवा मूल्यांकन होण्याची शक्यता बाद ठरते.म्हणून क्षेत्रसभेचा किंवा वार्डसभेचा अध्यक्ष हा मतदारामधून नियुक्त केला जावा.

६) सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्या विभागातील दहशतवादी व असामाजिक तत्वावर नियंत्रण ठेवणे,तशी माहिती पोलीसांना देणे,कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांना मदत करणे.अशा कामात क्षेत्रसभेचे सहकार्य मिळेल.

७) नगरराज बील हा केवळ एक उपचार न राहता स्थानिक स्वराज संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवणारी व परिक्षण करणारी ती अधिकारयुक्त संस्था असा

**आपल्याकडील चांगले दुसऱ्यास देण्यास डगमगू नका,ईश्वर त्यांच्यातील उत्तम तुम्हास देईल.**

ओळख कायद्याची

# ग्रामसभा व ग्रामसभेचे अधिकार



७३ वी घटनादुरूस्ती काय आहे ?

भारताच्या संविधानात ७३ व्या घटनादुरूस्तीमुळे मोठा क्रांतीकारीबदल घडून आला आहे.

१) ग्रामसभा व ग्रामपंचायत यांच्या अस्तित्वाला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला.

२) वर्षातून किमान सहा ग्रामसभा घेणे हे ग्रामपंचायतीवरघटनात्मक रित्या बंधनकारक ठरले

३) ग्रामपंचायतीला पाच वर्षाची सनदशीर मुदत मिळाली. कोणत्याही कारणामुळे यास मुदतवाढबेकायदेशीर ठरते

४)प्रत्यक्ष निवडून आलेले सदस्यच ग्रामपंचायत चालविण्यासघटनात्मकरित्या वैद्य नियुक्त सभासदांना ग्रामपंचायतीचा कारभारी म्हणून नियुक्तीस प्रतिबंध

५) राज्य वित्त आयोगाकडून थेट ग्रामपंचायतींना मदत देण्याच्या योजनेला घटनात्मक कवच व सुरक्षितता.शासकीय खजान्यावर काही प्रमाणात थेट भागीदारीचा हक्क प्रस्तापीत झाला.

६) पंचायत राज व्यवस्थेत महिला उमेदवारांना एक तृतीयांश (आता महाराष्ट्रात ५० टक्के) आरक्षण एससी व एसटींसाठी एक तृतीयांश आरक्षण सदस्य आणि पदासही

१) ग्रामसभा वर्षातून सहा वेळा घेण्यात येईल.

२)ग्रामसभेच्या दो सभामध्ये तीन महिन्यापेक्षा अधिक अंतर नसले पाहिजे.

३) ग्रामसभेच्या प्रत्येक नियमीत सभेपूर्वी गावातील महिला मतदारांची महिला ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे

४) सरपंच व उपसरपंचाने दिलेल्या कालावधीत ग्रामसभा बोलावली नाही तर अशा वेळी सचिव (ग्रामसेवक) सभा बोलावतील व सदर सभा सरपंच / उपसरपंच यांनी भरवली आहे असे गृहित धरण्यात येईल.

५)पचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणूकीनंतरच्या पहिल्य ग्रामसभेत सरपंच किंवा उपसरपंच ग्रामसभेचे अध्यक्ष स्थान भूषवितील.इतर सभाच्यावेळी गावातील जेष्ठ व अनुभवी व्यक्ती ग्रामसभचे अध्यक्ष म्हणून कामकाज पाहू शकतात.

६)गावात काम करणाऱ्या सर्व शासकीय/निमशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यावर ग्रामसभेचे शिस्तविषयक नियंत्रण राहिल.अशा कर्मचाऱ्यांच्या कामाचे वार्षिक मुल्यमापन त्यांच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.

७)राज्याच्या व केंद्रशासनांच्या व्यक्तीगत लाभांच्या योजना साठी गावातील गरजू व पात्र व्यक्तीची निवड ग्रामसभेत चर्चा करून ठरविली जाईल.

८) ग्रामसभेच्या पुढील सभेचा दिनांक वेळ व स्थान अगोदरच्या सभेत निश्चित केले जाईल.

९) ग्रामपंचायतीला सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना,कार्यक्रम किंवा प्रकल्प यांची अंमलबजावणी करण्यापूर्वी अशा योजनावर होणाऱ्या खर्चास ग्रामसभेकडून अग्रीम मान्यता घ्यावी लागेल.

१०) ग्रामसभेच्या प्रत्येक सभेचे कार्यवृत्त तयार करण्याची जबाबदारी ग्रामसेवकांवर राहिल.

रोकठोक मत



"सच्ची लोकशाही केंद्र मे बैठे हुए २० आदमी नही चला सकते.वो तो नीचे हर गॉव के लोगो द्वारा चलाई जानी चाहिए। ताकी सत्ता के केंद्र बिंदू जो इस समय दिल्ली ,कलकत्ता या बम्बई जैसे बडे शहरों मे है, मै उसे भारत के ७ लाख गाँव मे बांटना चाहुंगा ...."

– म.गांधी

# लोकसभा न विधानसभा
# सबसे उंची ग्रामसभा !

गेल्या ६५ वर्षात स्वातंत्र्याचे फळे दिल्लीपासून गल्ली पर्यंत पोहचलीच नाहीत.उलट लोकशाहीच्या नावाखाली शाही लोकांच्या काही सत्ताकांक्षी टोळया निर्माण झाल्या.दिल्ली, मुंबई,अशा ठिकाणी सत्ता एकवटली गेली. सामान्य माणूस ६५ वर्षात उपेक्षितच राहिला.दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणूकीत या फक्त एकदा मत द्यायचं. आपले प्रतिनिधी निवडून द्यायचे.नंतरची पाच वर्षे आमच्या गल्लीतल्या,गावांच्या, शिवाराच्या, मुलखांच्या जिल्हयाच्या सगळयांच्या विकासाचे निर्णय हे प्रतिनिधीच्या हातात द्यायचे.अशी व्यवस्था निर्माण झाली.फार विस्वासाने मतदान करून निवडून दिले परंतु या खासदार,आमदार नामक प्रतिनिधींनी गाव शिवारापर्यंत तसेच सामान्य माणसांपर्यंत सत्ता कधीच पोहचविलीच नाही.आज देशात लाखो शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरू आहेत.३० कोटी असंघटीत कामगार आहेत ज्यांना रोजच्या रोजीरोटीची कसलीही शाश्वती नाही.गावोगांव बेकारांच्या फौजा आहेत.आजही देशात आठ कोटी प्रोढस्त्रिया आणि पाच कोटी प्रोढपुरूष निरक्षर आहेत.गावातील जातीयवाद संपलेला नाही.भ्रष्टाचार पराकोटीला पोहचला आहे.आतंकवाद,सांप्रदायवाद धुसफुसत आहे.गरीबांसांठी सार्वजनिक इस्पीतळातून घृणास्पद म्हणता येईल इतकी वाईट आरोग्य सेवा उपलब्ध आहे.शिक्षणांचे बाजारीकरण झाले असून गरीबांना शिक्षणाची दारे बंद झाली आहेत.आम्ही निवडून दिलेले प्रतिनिधी आता आमच्या काही विकास व उद्धार करतील यावर सामान्य माणसांचा विस्वास उरलेला नाही.गेली साठ वर्षे सामान्य माणूस मतदान करतोय,परंतु प्रत्येक वेळेस पहिल्यापेक्षा अधिक खराब व अधिक भ्रष्ट लोक आमचे प्रतिनिधी म्हणून जात आहेत.त्यामुळे फक्त पाच वर्षातून एकदा मतदान करून या देशातील सामान्य माणसांचे भले होणार नाही.त्यामुळे आता यापुढे केवळ सरकारं कोणांच बनवायच हा सामान्य माणसंचा असणारा मतदानाचा हक्क पुरेसा ठरणार नाही.तर गावातील,राज्यातील व दिल्लीतील सरकार कसे चालवायचे याचाही हक्क सामान्य मतदारांना मिळायलाच हवा.अर्थात आम्हाला आमचे स्वराज्य बनविण्याचा हक्क मिळायलाच हवा.७३ व्या घटनादुरूस्तीने तो अधिकार आता सर्व नागरिकांना दिला आहे.फक्त आता गरज आहे तो अधिकार सर्वांनी मिळून परिणामकारक व प्रभावी रित्या वापरण्याची

– सुभाष वसेकर.

# तक्रार कोठे कराल?

## गृहनिर्माण विषयक तक्रारीसाठी

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास महामंडळ
गृहनिर्माण भवन बांद्रा (पूर्व)
मुंबई४०० ०५१
फोन :(०२२)२६५९२४९२
२६५९ ०६६०

## महिला बचतगट व अन्य आर्थिक योजना विषयक माहिती व संपर्कासाठी

**महिला आर्थिक विकास महामंडळ**
गृहनिर्माण भवन (म्हाडा इमारत) पोटमाळा
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१
फोन : (०२२) २६५९०७६८ २६५९१६२९

## महाराष्ट्र राज्य रस्ते व टोल विषयक तक्रारीसाठी

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
(एम एम आर डी सी )
प्रियदर्शनी पार्कजवळ नेपियन सी रोड मुंबई ३६
फोन :(०२२)२३६८६१११२

## झोपडपट्टी पूनर्वसन तक्रारी व संपर्कासाठी

झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण
(स्लम सेटलमेंट ऑथारिटी)
गहनिर्माण भवन म्हाडा इमारत ५वा मजला
बांद्रा पूर्व मुंबई ४०० ०५१
फोन (०२२)२६५९०४०५

## मुंबई विभागातील पायाभूत सुविधा तक्रारीसाठी

मुंबई महानगर विकास प्राधिकारण
(एम.एम.आर.डी.ए)
वांन्द्रे-कुर्ला संकूल वांद्रे(पूर्व) मुंबई ४०००५१
फोन : (०२२) २६५९९००१
फॅक्स : २६५९१२६४

## राज्य पोलीस प्रशासन

**पोलीस महासंचालक**
कार्यालय : शहिद भगतसिंह मार्ग
कुलाबा मुंबई ४०० ०३९
फोन (०२२)२२०२६६७२ २२०२६७४७
फॅक्स :(०२२) २२८४०५९८

## एस.टी.विषयक संपर्क व तक्रारीसाठी

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ आनंदराव नायर रोड, मुंबई -८
पी.बी.एक्स. २३०२३९००
फोन (०२२)२३०७२८१७

## राज्य नियोजन मंडळ सुचना / संपर्कासाठी

राज्य नियोजन मंडळ
नवीन प्रशासकीय भवन १८ वा मजला
मंत्रालयासमोर मुंबई ४०० ०३२
फोन (०२२)२२०२७२६८
२२०२५२८९

थोर कारणांसाठी मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे मरण हे त्यांचे यज्ञाच असते,पराभव नव्हे!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ

## मासिक नागरिक अधिकार

## आणि

## स्वराज बहुउद्देशीय संस्थेच्या

## सर्व उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती

## आता थेट इंटरनेटवरही उपलब्ध

## subhashbaswekar.blogspot.com/

## गुगल सर्च करा नागरिक अधिकार चे ताजे अंक वाचा माहिती अधिकार महासंघ महाराष्ट्रातील सभासदांची व कार्यकर्त्यांची सर्व इंत्यूभूत माहिती पहा.


नागरिक अधिकार च्या मालकीसंबंधी निवेदन

(फार्म) प्रपत्र - ४(नियम -८)

| | |
|---|---|
| १) प्रकाशन स्थळ | ए विंग प्लॅट नं ०३, साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड |
| २) प्रकाशन चा कालावधी मासिक | |
| ३)मुद्रकाचे नांव | सुभाष महादेव बसेवकर |
| भारताचे नागरिक आहेत काय ? | होय, आहेत. |
| मुद्रण स्थळाचे नाव व पत्ता | स्वराज प्रिंट प्रोसेस ऑफिस, सेक्टर-१० कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड |
| ४) प्रकाशकाचे नाव | सुभाष महोदव बसेवकर |
| भारताचे नागरिक आहेत काय ? | होय, आहेत. |
| पत्ता : | ए विंग प्लॅट नं ०३, साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड |
| ५) संपादकाचे नाव | सुभाष महोदव बसेवकर |
| भारताचे नागरिक आहेत काय ? | होय, आहेत. |
| पत्ता : | ए विंग प्लॅट नं ०३, साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड |
| ६)वृत्तपत्राच्या मालकाशिवाय अन्य कोणी १ टक्का पेक्षा अधिकचे भागीदार/ हिस्सेदार/भागधारक आहेत काय ? | कोणीच नाहीत. |
| ४) मालकाचे नाव | सुभाष महोदव बसेवकर |
| भारताचे नागरिक आहेत काय ? | होय, आहेत. |
| पत्ता : | ए विंग प्लॅट नं ०३, साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड |

मी सुभाष महादेव बसेवकर घोषीत करतो की वरील दिलेला निवेदनात्मक तपशील माझ्या माहिती व विस्वासप्रमाणे सत्य आहे.

सुभाष महादेव बसेवकर
प्रकाशक





छायाचित्र : भ्रष्टाचार विरोधी जनचळवळीचे कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांच्या फेसबुक वॉलवरून

व्यापक ध्येया प्राप्तीच्या प्रवासात मिळालेली तत्कालीन पराभव हा खरा पराभव नसुन तो विजय असतो.

# ग्रामपंचायत कार्यालयातील वार्षिक ताळेबंद हिशोब पुस्तके आदिची माहिती मागविण्यासाठीव कागदपत्रे निरिक्षणासाठीचा नमुना अर्ज

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती आधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय,
---------------------

१) अर्जदारांचे नाव ----------------------------------------------

२) पत्ता : -----------------------------------------------------

३) माहितीचा विषय :ग्रामपंचायतीचे सन २०१० ते २०११ या अर्थिक वर्षातील लेखापरिक्षण (ऑडिट) अहवाल मिळणेबाबत.व कागदपत्रे निरिक्षणास मिळणेबाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी(सन २०१० ते २०११)

अ) सन २०१०ते ११ व २०११ ते २०१२ या दोन वर्षातील आपल्या ग्रामपंचायतीचे झालेले लेखा-परिक्षण अहवालाची एक प्रत मिळावी.

ब) आपल्या कार्यालयातील रोकडवही,(कॅश बूक) लेजर बुक, मालमत्ता(असेट)नोंदवही बँक पासबूक,साठा नोंदवही (स्टॉक रजिस्टर) व्हाऊचर,करारनामे, हजेरी पत्रके, मोजमाप पुस्तिका आदी कागदपत्रे पाहणी व निरिक्षण करण्यासाठी दिनांक व वेळ लेखी कळवावा सदर कागदपत्रे पाहण्याचा प्रती घंण्टा पाच रूपयाप्रमाणे शुल्क भरण्यास तयार आहोत.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण :-------------------
दिनांक : ----------------------

अर्जदाराची सही
(नाव ------------------)
मो.:

# बऱ्याच वेळा काही ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेचे ठरावाबाबत नागरिकांना माहिती दिली जात नाही ती मिळावी यासाठी अर्जाचा नमूना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
## (जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिति आधिकारी
गट विकास अधिकारी
-----------------------------------

१) अर्जदारांचे नाव -----------------------------------------------

२) पत्ता : -------------------------------------------------------

३) माहितीचा विषय : गावात झालेल्या ग्रामसभामधील ठराव व संबंधीत विषयाची माहिती मिळणेबाबत लाभ / मदतीची माहिती मिळणेबाबत

४) आपल्या गावात सन २०१०-२०११ या वर्षात एकूण किती ग्रामसभा झाल्या.प्रत्येक ग्रामसभेच्या कार्यवृत्ताच्या प्रतीची छायांकित प्रत मिळावी.उपस्थित गामस्थंची नावे द्यावीत.

ब) सन २०१० ते २०११ मधील ग्रामसभेतील सर्व ठरावांच्य लेखी प्रती मिळाव्यात.

क) सन २०१० व २०११ मधील ग्रामसभेत झालेल्या किती ठरावांची अंमलबजावणी करण्यात आली किती ठराव प्रलंबीत आहेत.तपशीलवार माहिती द्यावी.

ड) ग्रामसभा होण्यापूर्वी गावात महिलांची विशेष ग्रामसभा भरते काय ? सन २०१० ते २०११ मध्ये एकूण किती महिलांच्या विशेष ग्रामसभा घेण्यात आल्या.या ग्रामसभांना उपस्थित महिलांची स्वाक्षऱ्यासहित असलेली यादी द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश: माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव -----------------)

मो.:

जितक्या कोवळ्या वयात चारित्र्य निर्मितीचे कार्य सुरू कराल, तेवढे ते परिणमकारक होईल.

# जि.प.शाळेतील शासकीयमान्यता प्राप्त प्राथमिक शाळेतील सर्वशिक्षा अभियान व अन्य शासकीय शालेय योजनांची माहिती मागविण्यासाठी अर्जाचा नमुना

## माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

द्वारा मुख्याध्यापक,

------------- शाळा

---------------------

१) अर्जदारांचे नाव ----------------------------------------------

२) पत्ता : ----------------------------------------------------

३) माहितीचा विषय : आपल्या शाळेत सर्वशिक्षा अभियान व अन्य शासकीय योजनाच्या माध्यमातून मिळणाऱ्या मदतीची माहिती मिळणेबाबत (२०१०-२०११)

४) सर्व शिक्षा अभियान किंवा अन्य शासकीय योजनेतून शाळा,वर्गखोल्या, टॉयलेट तसेच कम्पाऊड वॉल व स्वयंपाकगृह शेड इ बांधकामासाठी वरील काळात किती निधी आला.किती निधी खर्च झाला.

ब) शाळेतील शालेय पोषण आहार योजनेसाठी किती रूपये निधी मंजूर झाला , ? किती खर्च झाला आहे? उपलब्ध तपशील द्यावा

क) आपल्या शाळेतील किती विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व शालेय पाठयपुस्तके मिळाली त्यांची यादी मिळालेली पुस्तके तसेच शासनाकडून मिळालेली एकूण पुस्तके यांच्या संबधीची पोच पावती अशी सर्व तपशीलवार माहिती द्यावी.

ड ) आपल्या शाळेतील मुलींना रोजचा उपस्थिती भत्ता दिला जातो काय ? .उपरोक्त कालावधीत तो किती मुलींना मिळाला.अशा सर्व भत्ताप्राप्त मुलींची पूर्ण नावे द्यावीत.भत्ता मिळाल्यानंतर त्यांच्या स्वाक्षरी घेतलेल्या नोंदवहीच्या छायांकित प्रत द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः माहिती स्पीड पोस्टाने पाठवावी. /व्यक्तीश :

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ------------------ अर्जदाराची सही

दिनांक : --------------------- (नाव -----------------)

शेवटचे पान ..

# प्रेरणा

## क्रांती गीत

### ले मशाले चल पडे है .....

ले मशाले चल पडे है लोग मेरे गाँव के
अब अंधेरा लूट लेंगे लोग मेरे गाँव के ...।।
पूछती हैं झोंपडी और,पुछते हैं खेत भी
कब तलक लूटते रहेंगे लोग मेरे गाँव के
नया सूरज अब उगेगा,देश हर गाँव में
अग इकट्टे हो रहे हैं लोग मेरे गाँव के ...।।
चीखती हैं हर रूकावट ठोकरों की मार से
बेडियाँ खणका रहे हैं लोग मेरे गाँव के ...।।
देखों यारो जो सुबह फिकी सी थी आजतक
नया रंग उसमें भरेंगे लोग मेरे गाँव के ...।।
ज्ञान का दीपक जलेगा देश के हर गाँव में
रौशनी फैला रहें हैं लोग मेरे गाँव के ...।।
बिन लढे कुछ भी यहा मिलता नही ये जानकर
अब लढाई लढ रहे हैं,लोग मेरे गाँव के ...।।

प्रति,

पोस्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

पाठविणार

पत्ता: नागरिक अधिकार
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं. MAHMAR/2011/40781